# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०७ एप्रिल, २०१७ / चैत्र १७, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उद्योग व खनिकर्म मंत्री | |
| (३) | ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |
| (४) | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | |
| (५) | सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### जव्हार (जि. पालघर) येथे आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत बांधलेल्या आश्रमशाळांचे विद्युत जोडणीचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(१) * ७८३५१ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथे आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत बांधलेल्या ४ आश्रमशाळांच्या नव्या इमारतीचे विद्युत जोडणीचे काम गत २ वर्षांपासून प्रलंबित असून सदर इमारतीत बांधकाम व विद्युत जोडणीचे साहित्य विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सध्याच्या मोडकळीस आलेल्या आश्रमशाळांमध्ये वर्ग खोल्या व निवास खोल्यांची दुरावस्था झाली असून शौचालय, पिण्याचे पाणी व इतर मुलभूत सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रमशाळेचे काम त्वरित पूर्ण करुन विद्यार्थ्यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार अंतर्गत शासकीय आश्रमशाळा साखरे, देहरे, दाभेरी व विनवळ या ४ आश्रमशाळांपैकी साखरे आश्रमशाळेच्या नव्या इमारतीचे विद्युत फिटींगचे काम झाले असून दि.२६.१२.२०१६ रोजी उद्घाटन करून सदरची इमारत विद्यार्थ्यांच्या वापरात आहे. तेथे आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित देहरे, दाभेरी व विनवळ या तीन आश्रमशाळांचे बांधकाम पुर्ण झाले असून विद्युत फिटींगचे काम तातडीने पूर्ण करून इमारतींचा ताबा देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सुचना दिल्या आहेत.
(२) व (३) शासकीय आश्रमशाळा साखरे ही शाळा नविन इमारतीत स्थलांतरीत झाली आहे. तसेच शासकीय आश्रमशाळा देहरे, दाभेरी व विनवळ ह्या जुन्या इमारतीत सुरू असून तेथे स्नानगृहे, शौचालय, शेड, विद्युत व्यवस्था व पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध आहे. सदर इमारतीची शाळा व्यवस्थापन समितीमार्फत आवश्यक दुरूस्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर आश्रमशाळांचे विद्युतीकरणाचे काम तातडीने पुर्ण करून विद्यार्थ्यांना नविन इमारतीत स्थलांतरीत करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी (जि. अमरावती) येथील आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी कौशल्य विकास कार्यक्रमाकरिता अपात्र संस्थेची निवड केल्याबाबत

**(२) * ८२९९७ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी धारणी (जि.अमरावती) येथील प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांचेकडे १६ संस्थांचे प्रस्ताव दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या बैठकीत सादर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १६ संस्थांपैकी अपात्र असणा-या व कोणताही शासकीय परवाना नसणाऱ्या एकाच संस्थेला प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, धारणी यांनी संगनमताने कौशल्य विकास कार्यक्रमाचे काम दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची तक्रार सदर लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

कौशल्य विकास योजने अंतर्गत खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम घेतले होते.

१) हॉटेल मॅनेजमेंट प्रशिक्षण

२) गारमेंट मॅन्युफॅक्चरींग/फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण.

३) ऑटोमोबाईल्सचे प्रशिक्षण.

वरील योजनेसाठी अनुक्रमे ११, १४ व १५ असे एकूण ४० संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

(२) व (३) हे खरे आहे.

कौशल्य विकास योजने अंतर्गत ज्या संस्थेकडे, जाहिरातीच्या अनुषंगाने मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण, भौतिक सोयी सुविधा अनुभव, रोजगार उपलब्धतेबाबत हमी आहे अशा अटी व शर्तीच्या आधारे संस्थेची निवड, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, धारणी यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प स्तरीय गठीत समितीमार्फत संस्थेची निवड करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगरमधील कोणार्क इन्फास्ट्रक्चर कंपनीने औद्योगिक क्षेत्रावर रहिवाशी क्षेत्र विकसित केल्याबाबत

**(३) * ७७६६३ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगरमधील कोणार्क इन्फास्ट्रक्चर कंपनीने औद्योगिक क्षेत्रावर रहिवाशी क्षेत्र विकसित करताना शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून करोडो रूपयांचा महसुल बुडविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने सदर कंपनी व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच महसुल भरपाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) उल्हासनगरमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र नाही. तथापि महामंडळाच्या अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामधील भूखंड क्र. २८ क्षेत्रफळ ४०४६० चौ.मी. चे वाटप M/s. Bombay Malleable Iron Casting and Allied Industries Ltd. यांना करण्यात आले होते. परंतु भूखंडधारकाने आयडीबीआय, आयसीआयसीआय, आयएफसीआय आणि बँक ऑफ बडोदा या वित्तीय संस्थांच्या कर्जाची परतफेड न केल्याने Court Receiver, High Court यांचेमार्फत सदर भूखंडाची विक्री करण्यात येऊन भूखंडाचे हस्तांतरण मे. रिको ऑटो इंडस्ट्रिज यांचे नांवे करण्यात आले. त्यानंतर, सदर भूखंड मे. रिको ऑटो इंडस्ट्रिज यांच्या नांवावरुन मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि मे. मारुती इन्व्हेस्टमेंट भागिदार मे. कोणार्क प्रॉपर्टीज यांचे नांवे गिअर बॉक्स, हब असेंब्ली, क्लच बॉक्स, आईल पंप बोर्ड या उत्पादनाकरीता दिनांक १०.१०.२०१४ च्या आदेशान्वये हस्तांतरीत करण्यात आला आहे.

प्रस्तुत भूखंडावर कारखाना इमारत बांधकाम आराखडा कार्यकारी अभियंता, अंबरनाथ विभाग यांचेकडे दिनांक २७.१०.२०१६ रोजी मंजूरीकरीता सादर करण्यात आला असून सदर भूखंडावर रहिवासी क्षेत्र विकसित करण्यासाठी महामंडळामार्फत कोणतीही परवानगी दिलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आश्रमशाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत**

**(४) * ७६९८५ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०७५ आश्रमशाळांपैकी ५२९ शासकीय तसेच ५४६ खाजगी अनुदानित आश्रमशाळा असून कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता

आश्रमशाळांत तातडीने सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा कार्यान्वित करण्याचे निर्देश माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ अन्वये संवेदनशील जिल्ह्यातील शाळा व वसतीगृहातील सुरक्षेसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्याचे निर्देशही देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती शासकीय व खाजगी अनुदानित आश्रमशाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले वा करण्यात येत आहेत, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शासकिय आश्रमशाळांत आवश्यकतेनुसार सी. सी. टी. व्ही. कॅमेरे लावण्याबाबतच्या सुचना शासनस्तरावर वेळोवेळी पार पडलेल्या बैठकांदरम्यान तसेच दि.१७.३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सबंधितांना दिल्या आहेत.

(२), (३) व (४) सद्यस्थितीत ६९ शासकिय आश्रम शाळा व ८० अनुदानित आश्रमशाळांमध्ये सी. सी. टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. १८/११/२०१६ अन्वये आदिवासी विकास विभागाच्या सर्व शासकिय व अनुदानित आश्रमशाळांची तपासणी जिल्ह्यातील महसूल, विकास सेवा, पोलीस व आदिवासी विकास विभागातील महिला अधिका-यांमार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.सदर समितीने आश्रम शाळांच्या तपासणीचे काम पुर्ण केले असुन त्या बाबतचा अहवाल अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना सादर केला असुन त्याची छाननी करुन शिफारशीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथील आश्रमशाळेत वसतीगृह अधिक्षक व कर्मचाऱ्यांनी मुलींचे लैगिंक शोषण केल्याबाबत**

**(५) * ७७२२१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) येथील मागासवर्गीय मुलींच्या आश्रमशाळेत वसतीगृह अधिक्षक दत्तात्रय गोफणे व इतर तीन कर्मचाऱ्यांनी मुलींचे लैगिंक शोषण केल्याची व सदर आरोपी फरार असल्याची माहिती दिनांक २२ जानेवारी,२०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे. तथापि सदर आरोपी फरार झाले आहेत, हे खरे नाही.

(२) शासनाने गठीत केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील महिला अधिका-यांच्या समितीने केलेल्या चौकशीत सदर गैरप्रकार उघडकीस आला आहे. सदर प्रकरणी,उंब्रज पोलीस स्टेशन,ता. कराड,जि. सातारा येथे गुन्हा रजि क्र. १८/२०१७ दाखल करण्यात आला आहे तसेच श्री. दत्तात्रय गोफणे, वसतीगृह अधिक्षक, श्री. वसंत कळणू इंगळे, मुख्याध्यापक व श्री. दिलीप कळणू इंगळे, मदतनीस यांना अटक करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण पुणे यांनी सदर आश्रमशाळेची, मान्यता रद्द केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी कामगाराच्या वेतनात गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(६) * ७४०४३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे**

**(आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणद्वारे कंत्राटी कामगारांच्या वेतनासंदर्भात परिपत्रक क्र. ५३६ नुसार कंत्राटी कामगारांना किमान १२ हजार रुपये वेतन देणे बंधनकारक असल्याने सदर रक्कम महावितरणकडून कंत्राटदारास वेळोवेळी अदा केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र कंत्राटदारामार्फत कामगारांना केवळ तीन ते चार हजार रुपये देत असून उर्वरित रक्कमेचा महावितरणचे व्यवस्थापक आणि कंत्राटदार गैरव्यवहार करीत असल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास एका कामगाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीने केलेल्या कारवाईत उघड झाली असून याबाबत नांदेड पोलीस स्टेशनला तक्रार करण्यात येऊनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी तक्रार केली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यान्वये संबधित अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीच्या परिपत्रक क्र. ५३६ अनुसार कंत्राटी कामगारांना त्यांच्या कामाच्या परिमंडळाप्रमाणे तसेच कुशल, अर्धकुशल व अकुशल या वर्गवारी प्रमाणे वेतन व सेवा शुल्क कंत्राटदारास अदा करण्यात येते.

(२) संबंधित कामगाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, सदर कंत्राटदाराचे कंत्राट अधिक्षक अभियंता, महावितरण, नांदेड यांनी रद्द केले आहे.

(३) दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ च्या सदर निवेदनाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खामगाव (जि. बुलढाणा) येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर मेगा टेक्सटाईल हब उभारणेबाबत

**(७) * ८४०४३ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बुलढाणासह ८ कापूस उत्पादक जिल्हयांमध्ये सरकारच्या “कापूस तेथे गिरणी” या धोरणाअंतर्गत मेगा टेक्सटाईल हब उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बुलढाणा जिल्हयात सर्वात जास्त कापूस उत्पादन व व्यवसाय खामगाव येथे होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या हब उभारणीसाठी प्रत्येक जिल्हयातील औद्योगिक वसाहतीत जागा निश्चित करण्याचे आदेश औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,खामगाव (जि. बुलडाणा) येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर महाराष्ट्र सरकारच्या कापूस तेथे गिरणी या धोरणांतर्गत मेगा टेक्सटाईल हब उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अतिरिक्त यवतमाळ (जि.यवतमाळ), चिखली (जि.बुलढाणा), माजलगांव (जि.बीड), कृष्णूर (जि.नांदेड), मालेगांव (जि.नाशिक), भालेर (जि.नंदूरबार) तसेच कन्नड (जि.औरंगाबाद) जामनेर (जि.जळगांव), शेलू (जि.परभणी) या ठिकाणी मेगा टेक्सटाईल्स पार्कसाठी जमिनी उपलब्ध करुन देण्यात येणार असून भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. या ठिकाणी आवश्यकतेनुसार सी.ई.टी.पी. ची सुविधा तसेच रस्ते, पाणी व वीज व इतर पायाभूत सुविधा पुरविण्यात येणार आहे. बुलढाणा जिल्हयातील चिखली विकास केंद्राकरीता संपादित केलेल्या व ताब्यात असलेल्या जागेपैकी अंदाजे ४०.०० हेक्टर आर. जमिन टेक्सटाईल पार्क साठी आरक्षित करण्यात आलेली आहे. बुलडाणा जिल्हयात सर्वात जास्त कापूस उत्पादन व व्यवसाय खामगांव येथे होत असल्याने त्या ठिकाणी इन्टीग्रेटेड टेक्सटाईल पार्क

स्थापन करण्याकरिता मौजे-घाटपुरी तालुका खामगांव जिल्हा बुलढाणा येथील ई-क्लास (सरकारी) जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ताब्यात घेऊन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता भूनिवड समितीने पाहणी केलेली असून त्यासंबंधीचा प्रस्ताव उच्चाधिकार समिती समोर सादर करणेत येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हयामध्ये बनावट गोवा व हुबळीमेड मद्याची मोठया प्रमाणात विक्री होत असल्याबाबत**

**(८) * ७९८३६ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये गोवा व हुबळीमेड कंपन्याच्या मद्याच्या रिकाम्या बाटल्या भंगारातून विकत घेऊन त्यामध्ये बनावट मद्य भरुन त्याची हॉटेल्स, बार व ढाब्यावर विक्री केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) हे खरे आहे, सदर प्रकार नोव्हेंबर, २०१६ मध्ये उघडकीस आला आहे. या प्रकरणी सांगली जिल्ह्यात गु.र.नं. ११८/२०१६ व ११९/२०१६ असे दोन गुन्हे नोंदविले असून या दोन गुन्ह्यात ९ इसमांना अटक करण्यात आली आहे तसेच ३ वाहनांसह एकूण रु.८,६१,८०८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तर सांगली जिल्ह्यात दोन व कोल्हापूर जिल्ह्यात दोन अशा एफएल-३ च्या ४ अनुज्ञप्त्या निलंबित केलेल्या आहेत. या प्रकरणी नोंदविलेल्या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

## राज्यातील कोट्यावधी रुपयांच्या सहकारी साखर कारखान्यांची अत्यंत कमी दरात विक्री करण्यात आल्याबाबत

**(९) * ७३९७९ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक सहकारी तत्त्वावरील कोट्यावधी रुपयांचे सहकारी साखर कारखाने संचालकांकडून अवसायनात गेल्याचे दाखवून सदर कारखान्यांची अत्यंत कमी दरात विक्री करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबादेवी सहकारी साखर कारखान्याची किंमत रु. १०० कोटी असताना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने हा कारखाना १५ कोटी रुपयांना कायनेटीक पेट्रोलियम प्रा.लि. या कंपनीस विकला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी राज्यात अवसायनात गेल्याचे दाखविलेल्या एकूण किती व कोणकोणत्या सहकारी साखर कारखान्यांची कमी दराने विक्री झालेली आहे,

(४) तसेच राज्यात सहकारी साखर कारखान्यानी अनियमितता व गैरप्रकार केल्याप्रकरणी यापुढे नव्या सहकारी साखर कारखान्याला परवानगी देवू नये असे मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २६ जुलै, २००६ रोजी आदेश दिले असतानाही तत्कालीन शासनाने मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन करून सुमारे ५८ नव्या कारखान्यांना परवानगी दिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हेखरे नाही. सदर कारखान्याची विक्री केंद्र शासनाच्या सरफेसी (Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security interest act २००२) या कायद्यांतर्गत व शासकीय मूल्यांकनकारांनी केलेले मूल्यांकन विचारात घेऊन जाहीर निविदा पद्धतीने केली आहे.

(३) राज्यात एकूण १०२ कारखाने अवसायनात आहेत, त्यापैकी २९ कारखान्यांची जाहीर निविदा पद्धतीने/ शासकीय मूल्यांकनकारांनी केलेल्या मूल्यांकनानुसार विक्री झाली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खेड (जि.पुणे) तालुक्यात १६१ गावांमध्ये दारूबंदी करण्याबाबत**

**(१०) * ८३९२१ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यात दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या ग्रामसभांमध्ये १६१ ग्रामपंचायतींनी संमत केलेल्या दारूबंदीच्या ठरावांच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी (खेड) यांनी पोलीस निरीक्षक, चाकण व राजगुरुनगर पोलीस स्टेशन यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी लेखी कळवून त्वरीत दारूबंदीची कार्यवाही करावी असे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी जिल्हाधिकारी,पुणे यांना दारूबंदी त्वरित करण्याबाबत लेखी स्वरूपात मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्याप प्रशासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

स्थायी समिती, जिल्हा परिषद, पुणे येथील दिनांक १२.८.२०१६ च्या सभेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत ग्राम पंचायतींमध्ये व्यसनमुक्ती होण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ च्या ग्रामसभेमध्ये अवैध दारु विक्रीस बंदी तसेच COTPA कायदा २००३ अन्वये शाळा व परिसरात तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थास विक्री बंदीबाबत चर्चा करुन गाव व्यसनमुक्त करण्याबाबत ठराव करण्यात आला. त्यास अनुसरुन खेड तालुक्यातील १६१ ग्रामपंचायतींपैकी १५१ ग्रामपंचायतींमध्ये व्यसनमुक्ती व अवैध दारुबंदी असे संमिश्र ठराव घेण्यात आले आहेत.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खेड यांनी दिनांक २६.८.२०१६ रोजी वर नमूद व्यसनमुक्ती व अवैध दारुबंदी असे संमिश्र असलेले १५१ ग्रामपंचायतींचे ठराव पोलिस स्टेशन चाकण व खेड यांचेकडे पाठविले आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही. तथापि खेड तालुक्यातील १६१ ग्रामपंचायतींपैकी ३१ ग्रामपंचायतींमध्ये परवाना प्राप्त दारु दुकाने आहेत. त्यापैकी ४ ग्रामपंचायतींमध्ये कोणतेही ठराव झाले नाहीत, २३ ग्रामपंचायतींमध्ये अवैध दारुबंदी, तंबाखुबंदी व व्यसनमुक्तीचे ठराव झाले आहेत व ४ ग्रामपंचायतींमध्ये संपूर्ण दारुबंदी व दारुमुक्तीचे ठराव झाले आहेत. सदर दारुबंदीबाबतचे ठराव हे मुंबई दारुबंदी कायदा १९४९ च्या मुंबई दारुबंदी आदेश २००८ नुसार झालेले नाहीत. हे लक्षात घेता सदर ४ ग्रामपंचायती व अन्य कोणत्याही ग्रामपंचायतींमध्ये संपूर्ण दारुबंदी करावयाची असल्यास मुंबई दारुबंदी कायदा १९४९ च्या मुंबई दारुबंदी आदेश २००८ प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा परिषद, पुणे मार्फत सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना दिनांक २३.३.२०१७ रोजी देण्यात आले आहेत. तसेच उक्त आदेशानुसार प्राप्त झालेल्या दारुबंदी ठरावांबाबत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते तसेच अवैध दारुधंदयांविरुद्ध कारवाई केलेली आहे.

-----------------

**अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी विविध केंद्रिय सहाय्य योजना व ठक्करबाप्पा योजनेमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(११)** * *८३८८६* **श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शासकीय शिष्यवृत्ती, विविध केंद्रिय सहाय्य योजना व ठक्करबाप्पा योजनेमध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत त्यांचेविरुद्ध नागपूर हुडकेश्वर पोलिस ठाणे येथे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अप्पर आयुक्त, अमरावती यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) श्री. देवराम रूपचंद मरसकोल्हे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती रकमेचा अपहार केल्याबाबत प्राचार्य, विवेकानंद कॉलेज, नागपूर व तत्कालिन प्रकल्प अधिकारी, नागपूर प्रकल्प तथा सद्यस्थितीत कार्यरत अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या विरोधात दि.१७.०२.२०१७ रोजी हुडकेश्वर पोलिस ठाणे, नागपूर येथे एफ.आय.आर.दाखल करण्यात आलेला आहे, हे खरे आहे. तथापि, यामध्ये विविध केंद्रिय सहाय्य योजना व ठक्करबाप्पा योजनमेध्ये गैरव्यवहार केल्याची तक्रार नाही.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी पोलिसांकडून चौकशी सुरू असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जामठी व पाडळी (ता. जि. बुलढाणा) येथे शबरी आवास योजने अंतर्गत मंजूर घरकुलांसाठी लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणेबाबत

**(१२) * ८००५० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जामठी व पाडळी (ता. जि. बुलढाणा) येथे शबरी आवास योजने अंतर्गत मंजूर घरकुलांसाठी आदिवासी लाभार्थ्यांना शासकीय जमीन उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक ७ जानेवारी २०१६ व दिनांक २ नोव्हेंबर २०१६ रोजी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदन प्राप्त झाले असल्यास त्या अनुषंगाने शासनाने सदर लाभार्थ्यांना शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) या संदर्भात मा.श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे दि.७ जानेवारी, २०१६ चे पत्र एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अकोला यांचेकडे प्राप्त झाले नसून दि.२ नोव्हेंबर,२०१६ व दि.१५ नोव्हेंबर, २०१६ ची पत्र प्राप्त झाली आहेत.

(२) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांनी तहसिलदार बुलढाणा, उपविभागीय अधिकारी, बुलढाणा व ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पाडळी यांना पाडळी येथील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधून देण्याकरीता भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत दि.११/११/२०१६ अन्वये पत्र दिले, तसेच जामठी व पाडळी येथील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधुन देण्याकरीता भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांनी तहसिल बुलढाणा, उपविभागीय अधिकारी, बुलढाणा व ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जामठी यांना दि.१३/१२/२०१६ अन्वये पत्र दिले. तसेच पात्र लाभार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करणेबाबत पाक्षिक/मासिक सभेमध्ये ग्रामसेवकांना कळविले असता जामठी व पाडळी या गावांत खाजगी जागा विक्रीस उपलब्ध नाही, असे ग्रामसेवकांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बुलढाणा यांना कळविले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील सौर कृषी-पंप वाटपाचे उद्दिष्ट अपूर्ण राहिल्याबाबत

**(१३) * ८२८७० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महावितरणच्या सहकार्याने राज्यातील मागास व दुर्गम भागातील वीस जिल्ह्यांत व विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांत दिनांक १ मे २०१६ पासून सौर कृषिपंप योजना चालू केली असून पहिल्या वर्षी १० हजार पंप लावण्याचे लक्ष्य असताना देखील आतापर्यंत फक्त १७०० पंपच लावले गेले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्दिष्ट अपूर्ण राहण्याची कारणे काय,

(३) तसेच शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार या योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उर्वरित महिन्यांत ८३०० एवढे कृषी पंप लावण्याची गरज

असून सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, या योजनेत काही बदल करून योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर योजनेत लाभार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. लाभार्थ्यांचा अल्प प्रतिसाद, ऑफ ग्रीड सौर कृषीपंप ही टेक्नॉलॉजी अत्याधुनिक प्रणाली असल्यामुळे, नवीन तंत्रज्ञानासंबंधी भीती, सौर पॅनल, पंप, केबल, पाईप इत्यादी चोरी जाण्याची भीती, सौर पंप घेतल्यास पारंपरिक पद्धतीने वीज जोडणी मिळणार नाही इत्यादी गैरसमजांपोटी योजनेस प्रतिसाद अल्प होता. त्यामुळे योजना अपेक्षित काळात पूर्ण होऊ शकली नाही.
(३) योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी लाभार्थी निवडीच्या निकषांमध्ये अंशत: बदल केले आहेत. जसे, लाभार्थ्यांच्या जमिनीचे क्षेत्र १० एकरपर्यंत वाढविले आहे. तसेच सौर कृषी पंप योजनेत भाग घेणाऱ्या लाभार्थ्यांना १० वर्षांनंतर पारंपरिक पद्धतीने वीज जोडणी मिळेल. योजनेच्या प्रसिद्धीसाठी शेतकऱ्यांचे मेळावे घेणे, ज्याठिकाणी सौर कृषी पंप आस्थापित झाले आहेत तेथे शेतकऱ्यांच्या भेटी आयोजित करणे, बस स्टँड, आठवडे बाजार/ बाजार इत्यादी ठिकाणी बॅनर लावणे, स्थानिक वृत्तपत्रे, दूरदर्शन व आकाशवाणी इत्यादीद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. सदर योजना सद्यस्थितीत सुरु असून शेतकरी लाभार्थ्यांचा प्रतिसाद वाढतो आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगाव पेठ (जि.अमरावती) या एमआयडीसी अंतर्गत नविन प्रस्तावित उद्योगांना चालना मिळण्याबाबत

**(१४) * ८३८५९ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव पेठ (जि.अमरावती) या एम आय डी सी अंतर्गत नविन प्रस्तावित उद्योगांना चालना मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम, उद्योग व पर्यावरण राज्यमंत्री यांना दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय. हे खरे आहे.

(२) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने महामंडळाने अतिरिक्त अमरावती नांदगांवपेठ (टेक्सटाईल पार्क) येथे ८०० हेक्टर जागा आरक्षित केलेली असून त्यामध्ये ३८ भूखंड आरेखित करण्यात आले आहेत. त्यामधील २१ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यावरील उद्योगांमधून १७,६५२ एवढा रोजगार उत्पन्न होणार आहे. सदर टेक्सटाईल पार्कसाठी रस्ते, वीज, पाणी आणि सामायिक सांडपाणी निचरा केंद्र (CETP) यासारख्या मूलभूत सोयीसुविधांची कामे करण्यात आली आहेत. यामध्ये १९ मेगा प्रकल्पाना भूखंड वाटप करण्यात आले असून ४ भूखंडांवरील कारखान्यात प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुगोंली व कोगांव (जि. यवतमाळ) येथील कोळसा खाणीमुळे शेतजमिनीवर झालेला दुष्परिणाम

**(१५) * ८४३६२ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अधिनस्त असलेल्या कोल इंडिया अंतर्गत वणी उत्तर क्षेत्रात (जि. यवतमाळ) १४ कोळसा खाणी असून मुंगोली व कोलगांव खाणीतील उत्खननानंतर मोठया प्रमाणात उत्खनीत झालेली माती परिसरातील शेतांलगत टाकल्याने अंदाजे ६०० हेक्टर शेतजमिनीवर दुष्परिणाम झाल्याने शेतक-यांना शेती करता येत नसल्याचे माहे आक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंगोली व कोलगांव खान क्षेत्रामध्ये वायु प्रदुषण, धुलिकण प्रदुषण व जलप्रदुषणाने मानवी आरोग्यही संकटात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची संबधीत विभागाने दखल घेवून मातीचे ढिग हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तोंडगाव (ता.चांदूर बाजार,जि.अमरावती) येथील एमआयडीसी अचलपूर किंवा चांदूरबाजार तालुक्यातील पडीत क्षेत्रावर उभारण्याबाबत

**(१६) * ८२९३९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडगाव (ता.चांदूर बाजार,जि.अमरावती) येथील एमआयडीसीसाठी १७८ हेक्टर शेतजमिनीचे संपादन करण्यात आले असून विविध आकारांचे १०५ औद्योगिक भूखंड पाडण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही संपादीत करण्यात आलेली जमीन काळी व कसदार असून या जमिनीवर अजूनही शेतकरी शेती करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही सुपिक कसदार जमीन शेतीसाठी आवश्यक असल्यामुळे या जमिनीवरील विकास आराखडा स्थगित करून अचलपूर वा चांदूरबाजार तालुक्यातील पडीत क्षेत्रावर एमआयडीसी उभारण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय. हे खरे आहे.

(२) आरेखित करण्यात आलेल्या १०५ भूखंडांपैकी, ९० भूखंडांवर स्थानिक शेतकरी नियमबाह्य शेती करीत आहेत.

(३) होय. हे खरे आहे.

तोंडगाव एमआयडीसी तालुका चांदूरबाजार जिल्हा अमरावती येथील विकास केंद्रांतील विकसित करण्यात आलेल्या आराखड्याला स्थगिती देऊन तालुका चांदूर बाजार अंतर्गत बहिरम, फुबगांव, आसेगांव किंवा तालुका अचलपूर

अंतर्गत भूगांव येथील पडीत क्षेत्रावर नवीन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे.
(४) निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्तरावरील भूनिवड समिती सदर क्षेत्राची पाहणी करणार असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्थेने सुरु केलेल्या प्रकल्पात अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * ८३५३७ डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांबू प्रक्रिया सहकारी संस्थेने जिल्ह्यातील आदिवासी लोकांना बांबू प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगार प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने १९ कोटी ४० लक्ष ९४ हजार रुपयांचा बांबू प्रकल्प गडचिरोली प्रकल्प कार्यालयाकडून प्रस्ताव न पाठविताच मंजूर करुन घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी ७ कोटी ३१ लक्ष रुपयांचे वितरणही सदर संस्थेला करण्यात आले असून सदर प्रकल्पात अनियमितता झाल्याची तक्रार आदिवासी विकास विभागाच्या सचिवांकडे आल्याने त्यांनी पुढील ५ कोटी १७ लक्ष रूपयांचा निधी रोखून ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेने प्राप्त झालेल्या निधीतून या भागात कोणतेही काम केले नसून शासनाने या प्रकरणाची व संस्थेची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार या संस्थेवर व संस्थाचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.
गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांबू प्रक्रीया सहकारी संस्थेचा प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचे कडून

दि. २९/०६/२०१२ रोजीच्या पत्रान्वये खास बाब म्हणून अपर आयुक्त यांना सादर करण्यात आला होता.

(२) अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांबू प्रक्रीया सहकारी संस्थेच्या प्रकल्पाकरीता मंत्रीमंडळाच्या मान्यतेने एकुण रु. १९.४० कोटी दि. ०६/०६/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आले होते. यापैकी ३५% शासकीय भागभांडवल, ३५% शासकीय दिर्घ मुदतीचे कर्ज, २५% नाबार्डचे कर्ज व ५% संस्थेचे भाग भांडवल याप्रकारे मंजूर करण्यात आले होते. यापैकी शासकीय भागभांडवल व शासकीय दिर्घ मुदती कर्जाकरीता सदर प्रकल्पा करीता संस्थेस रु. ८०९.८५ लक्ष निधी दोन टप्प्यांमध्ये वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत रक्कम केंद्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त करण्यात आली आहे यापैकी केंद्र शासनाचा पहीला हफ्ता रु. ५ कोटी १७ लक्ष निधी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेस्तरावर राखून ठेवला आहे.

(३) सदर संस्थेची सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने व जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्या अहवालाच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश दि. २०/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) चौकशी चालु आहे. चौकशी अहवलानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थी शालेय साहित्यांपासून वंचित असल्याबाबत

**(१८) * ८३४२३ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांतील सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील शालेय साहित्य, स्वेटर बूट इ.करीता रु. ८७ कोटी रुपयांच्या निविदा गैरव्यवहारामुळे रद्द झाल्याने सुमारे २ लाख विद्यार्थी सदर साहित्यापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आणि सदर प्रकरणात गैरव्यवहार करणाऱ्या संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे, खरे नाही,

राज्यातील शासकिय आदिवासी आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना शासन निर्णय दि. १०/३/२०१६ अन्वये निश्चित केलेले विविध साहित्य व वस्तू पुरवठा करणेसाठी सन २०१६-१७ शैक्षणिक वर्षात संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व आयुक्त, आदिवासी विकास यांचे स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार शालेय साहित्य व बूट यांचे वाटप करण्यात आले आहे. आयुक्त, आदिवासी विकास यांच्या स्तरावरुन स्वेटर पुरवठ्याबाबत राबविण्यात आलेली अंदाजे रु. १० कोटी रकमेची ईनिविदा रद्द करुन स्वेटरची रक्कम विदयार्थ्यांच्या / पालकांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे मुंबई-आग्रा महामार्गावर दोन लाख रुपये किमतीचा विदेशी अवैध मद्यसाठा जप्त केल्याबाबत

**(१९) * ८३२२२ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे मुंबई-आग्रा महामार्गावर दोन लाख रुपये किंमतीचा विदेशी अवैध मद्यसाठा रुग्णवाहिकेतून नेला जात असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास जप्त केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपींवर पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथक, नाशिक यांनी या प्रकरणी महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अन्वये गु.र.नं.२१/२०१७, दि.१७/०२/२०१७ नोंदविलेला आहे व एका इसमास अटक करण्यात आलेली आहे. प्रस्तूत प्रकरणी भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (दादरा नगरहवेली करीता विक्री असलेला) मद्यसाठा मारुती सुझुकी इको वाहन क्र. एमएच-१५, ईएफ-७२२ या रुग्णवाहिकेसह एकूण रु.३,८९,२८०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

## नाशिक जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांनी 'आनंदी पेटी' च्या माध्यमातून केलेल्या तक्रारी

**(२०) * ७४०४५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये ३० पथकांच्या माध्यमातून वेगवेगळ्या तालुक्यातील आश्रमशाळांची 'आनंदी पेटी' घेऊन तपासणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'आनंदी पेटी' च्या माध्यमातून आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींना लेखी तक्रार करण्याचे आवाहन पथकाकडून करण्यात आल्याने आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींनी मोठ्या प्रमाणात तक्रारी पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याअनुषंगाने सदर तक्रारींचे निवारण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली  वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महीला अधिका-याच्या तपासणी पथकाने आश्रमशाळांच्या केलेल्या तपासणी दरम्यान आनंदी पेटी मध्ये काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यातील ३ आश्रमशाळांमध्ये लैंगिक छळाच्या निनावी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींची सखोल चौकशी करण्यात आली असता एका तक्रारीत तथ्य दिसून आल्याने  संबंधित दोषी शिक्षकास निलंबित करण्यात आले आहे. इतर दोन तक्रारीत तथ्य आढळले नाही. तक्रार पेटीत प्राप्त इतर तक्रारी या बहुतांशी सोयी सुविधांबाबत आहेत. त्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.